पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/०३/२०१८** वेळ - दुपारी **०३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शनिवार दिनांक **०३/०३/२०१८** रोजी दुपारी **०३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव - उपसभापती
३. मा.भोईर सुरेश शिवाजी
४. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
५. मा.कोकणे संतोष अंकुश
६. मा.जावेद रमजान शेख
७. मा.यादव मीनल विशाल

याशिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्य यांचे मान्यतेने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले-**

विषय क्र.३) सभा आयोजनाबाबत – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) वॉर्ड क्र.६३ नाशिक फाटा चौक येथे स्वच्छता गृह बांधणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) वॉर्ड क्र.६३ मध्ये नविन संडासब्लॉक बांधणेबाबत - मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) सिमाभिंतीच्या कामाबाबत - मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२३/०२/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक – २२**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले..

----------

ठराव क्रमांक – ८६ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०३/०३/२०१८

सुचक – मा. सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

विषय - नवी सांगवी वॉर्ड क्र.५८ येथील स्वच्छता गृहाचे नुतनीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८७ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २३/०२/२०१८ विभाग – अ प्रभाग (स्थापत्य)

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/न/कावि/१४८/२०१८ दि.०२/०२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्रमांक २५ भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे (“निविदा क्र.२०/३१-२०१७-१८” ) निविदेअंतर्गत कामात नागरिकांच्या सोयीसाठी स्थळ बदल करून नवीन प्रभाग क्रमांक १४ कार्यक्षेत्रातील काळभोरनगर स.न.६४ काळभोर इंडस्ट्रीयल इस्टेट येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक – ८८ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०३/०३/२०१८

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १६/०३/२०१७ ची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक २७/०३/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८९ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०३/०३/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव, अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

वॉर्ड क्र.६३ नाशिक फाटा चौक येथे स्वच्छतागृह बांधणेसाठी निविदा क्र.५४/२७-२०१७-१८ निविदा र.रु.१५,००,०००/- हे निविदेचे काम करणेत येत आहे. परंतु नाशिक फाटा चौकात स्वच्छता गृहाकरिता जागा उपलब्ध नाही. त्यामुळे मा.नगरसदस्य यांनी सदर कामातून प्रभाग क्र.२० येथील स्वच्छतागृहांची दुरुस्ती करणेचे सुचविले आहे तरी निविदा क्र.५४/२७-२०१७-१८ कामातून प्रभाग क्र.२० येथील स्वच्छतागृहांची दुरुस्ती करणेचे स्थळबदलाचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९० विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०३/०३/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव, अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

वॉर्ड क्र.६३ मध्ये नविन संडासब्लॉक बांधणेसाठी निविदा क्र.५४/२१-२०१७-१८ निविदा र.रु.१५,००,०००/- हे निविदेचे काम करणेत येत आहे. परंतु नाशिक फाटा चौकात स्वच्छता गृहाकरिता जागा उपलब्ध नाही. त्यामुळे मा.नगरसदस्य यांनी सदर कामातून प्रभाग क्र.३० येथील स्वच्छतागृहांची दुरुस्ती करणेचे सुचविले आहे तरी निविदा क्र.५४/२१-२०१७-१८ कामातून प्रभाग

क्र.३० येथील स्वच्छतागृहांची दुरुस्ती करणेचे स्थळबदलाचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९१ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०३/०३/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव, अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

मधुबन प्रभाग क्र.५९ मनपा विकास आराखडयातील ताब्यात येणा-या जागांचे सिमांकन करुन सिमाभिंत बांधणे (निविदा नोटीस क्र.४२/४१-२०१७-१८ कामाचा आदेश क्र.स्था/नि/क-मुख्य /८३/२०१८, दि.३०/०९/२०१७) या कामांतर्गत व सांगवी प्रभाग क्र.३२ मधील **PWD** मैदानावरील बॅडमिंटन हॉल लगतच्या सिमाभिंतीच्या विस्तारीकरणाचे काम व इतर स्थापत्य विषयक कामे करण्याचे स्थळबदलाचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/१०२/२०१८
दिनांक : १४/०३/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.